मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २३९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण करून रमजान ईद सण उत्साहात

### खासदार, आमदार आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने मुस्लिम बांधवांना शुभेच्छा






**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात पवित्र रमजान सण सोमवार (दि ३१) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रमजान ईद निमित्त शहरातील कदीम जालना ईदगाह मैदानावर मुस्लिम समाज बांधवांनी सामूहिक नमाज पठण करून नमाज अदा केली. यावेळी परिसरातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने नमाजसाठी उपस्थिती दर्शविली. नमाज पठण झाल्यानंतर देशामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था, भाईचारा अबाधित राहण्यासाठी दुवा करण्यात आली.

यावेळी जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पंचाळ महापालिका आयुक्त संतोष खांडेकर पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल अप्पर पोलीस अधीक्षक आयुष निपाणी आणि परिसरातील हिंदू बांधव तसेच राजकीय क्षेत्रातील मंडळी व जिल्हा प्रशासनाच्या वतीने मुस्लिम समाज बांधवांना गुलाब पुष्प देऊन पवित्र रमजान ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कायदा व शांततेच्या अनुषंगाने ईदगाह परिसरात पोलीसांच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला होता. यावेळी मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घाणेवाडी येथे गुरूवारी संदल शरीफ

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराजवळील घाणेवाडी येथे गुरूवारी (दि.३) दुपारी ४.३० वाजता हजरत दावल शहा मलीक बाबा यांचा संदल कार्यक्रम ३ एप्रिल रोजी होणार आहे. तर शुक्रवारी (दि.४) आई भवानीचे सोंग सकाळी ६ वाजता निघणार आहे.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पा. दानवे, आ. अर्जुनराव खोतकर, मा.आ. कैलास गोरंट्याल, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पा. वाढेकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, आदिंची उपस्थिती राहणार आहे. यावेळी भजन व कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशितील भाविकांनी घ्यावा असे आवाहन वाल्मीक बावणे, संजु खरात, सुभाषराव कावले, सय्यद ईशाक, बाळा पा. ढासाळ, चंद्रशेखर शर्मा, मुजावर सय्यद रशदी भाई, अंकुश राऊत, वामन राऊत, हरिदास शेवते, राजेश राऊत, रवि राऊत, सुरेश राऊत, बाळा पा. डासाळ, ड. झिंगराजी मिसाळ., बापुजी घायाळ, मुजादिन भाई बॅटरीवाले, रवि जाधव, सतीश देशमुख, नारायण पा. गजर, विठ्ठल चौधरी, हरिभाऊ चव्हाण, अनिल राऊत, मुस्ताक , प्रदिप मुळे, विकास बोडले., जीवन सले, भास्कर चंद व इतरांनी केले आहे.

## स्फोटके निर्मिती कंपनीला आग

**नागपूर -** जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील येनवेरा गावातील एसबीएल एनर्जी नावाच्या स्फोटके बनवणाऱ्या कंपनीच्या गोदामाला मोठी आग लागली. या आगीत दोन मशीन जळून राख झाल्याची माहिती आहे. ही घटना सोमवारी पहाटे पाच वाजताच्या सुमारास घडली असून या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, अचानक पान २ वर

युवा आदर्श

### एप्रिल महिना ...

एप्रिल महिना येता
खुशीत नेते मंडळी
किती मनसुबे करी
धमाल करे गोंधळी
फूल बनवा जन्तेला
जन्मजात ती खुळी
मुर्ख बनविले तरी
खुशीत वाजे टाळी
अकलेचे लावा दिवे
जोरात बडवा थाळी
का वेडा बनण्याची
आमची नेहमी पाळी
देणार देणारं म्हणा
आश्वासने ना पाळी
कळत नाही हळूवार
हातात देतात झोळी
असो पक्ष कुठलाही
सारखीचं असे टोळी
सतत करता पागल
कसे बुवा न कंटाळी
एप्रिल महिना कोरला
सामान्यांच्या कपाळी
काना मध्ये घातलेली
मुर्खत्वाची बिगबाळी
मुर्खत्वाच्या फांदीवर
फुले बुध्दीमत्ता कळी
एप्रिल फूलचे फुलाची
रंगतदार असे पाकळी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## प्रभात किरण प्रकृती केंद्राचे उदघाटन

**जालना । प्रतिनीध -** जालना शहरामध्ये मयुर भांगडिया, राम गोपाल सोनी, अमित नंदा यांच्या प्रभात किरण प्रकृती केंद्र उद्घाटन सोहळा माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

या प्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, देशाचे प्रधानमंत्री ते मुख्यमंत्री पर्यंत सौर ऊर्जा प्रकल्पावर खूप भर देताना दिसत आहेत यामुळे प्रभातकिरण सौर उर्जा केंद्र आपल्या जालना शहरामध्ये सुरु होत आहे ही खूप आनंदाची बाब आहे प्रभात किरण प्रकृती केंद्र संचालक, व्यवस्थापक, अधिकारी, कर्मचारी तसेच प्रभात किरण प्रकृती केंद्र परिवारास पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



या प्रसंगी कार्यक्रमाला उपस्थित माजी आमदार अरविंद अण्णा चव्हाण, माजी आमदार सुरेश कुमार जेथलिया, भास्कर अंबेकर जिल्हा प्रमुख उबाटा, ए.जे. बोराडे जिल्हा प्रमुख,विष्णु पाचफुले,शहरप्रमुख, दिलीप राठी, संपादक पार्श्वभूमी, घनश्याम गोयल, नितीन काबरा शिवरतन मुदडा, बजरंग भक्कड, मेघराज चौधरी, पांडुरंग सोनी, संजय देठे, सुनील लाहोटी, मयूर भागडीया,राम गोपाल सोनी,अमित नंदा, तसेच प्रभात किरण प्रकृती केंद्र उद्घाटन सोहळा प्रसंगी आलेले राजकीय, सामाजिक, व्यवसायिक, तसेच विविध क्षेत्रातील सर्व स्नेही यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वस्तू भांडार असोसिएशनच्या बॉक्स क्रिकेट स्पर्धेत महेश मॅरेट संघ विजेता

**जालना । प्रतिनिधी -** श्री जालना वस्तू भांडार असोसिएशनतर्फे आयोजित पहिल्या बॉक्स क्रिकेट स्पर्धेत महेश मॅरेट संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद मिळवले, तर किचन मार्वल्स संघ उपविजेता ठरला. आरोग्यदायी जीवनशैली, खेळातून एकत्र येण्याची संधी आणि सांघिक भावना दृढ करण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ही स्पर्धा २८ मार्च रोजी केनिया टर्फवर पार पडली. महेश मॅरेट, किचन मार्वल्स, श्रीराम सेना आणि जालना लायन्स या चार संघांनी सहभाग घेतला. अंतिम फेरीत महेश मॅरेट आणि किचन मार्वल्स यांच्यात लढत झाली. किचन मार्वल्स संघाने प्रथम फलंदाजी करत ८ षटकांत ४५ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल महेश मॅरेट संघाने फक्त १ षटक २ चेंडूतच ४६ धावांचे लक्ष्य पार करत विजेतेपद पटकावले. महेश मॅरेट संघाच्या चेतन दोडकेने ४ षटकार तर गोविंद ओझाने ३ षटकार ठोकत अवघ्या ९ चेंडूत विजय मिळवून दिला. या स्पर्धेत चार सामन्यात २०१ धावा काढणारा पान २ वर




## प्राचीन मंदिरांमधील विज्ञान समजून घेण्याची गरज - आ. बबनराव लोणीकर

### श्री कालिंका देवी संस्थान हेलस येथे यात्रा उत्सव कार्यक्रम

**मंठा । प्रतिनिधी-** भारतीय परंपरेनुसार दररोज सकाळी कामावर किंवा इतर कोठेही जाण्यापूर्वी मंदिरात जाऊन देवदर्शन करण्याची प्रथा आहे, कारण मंदिर प्राचीन काळापासून जनसामान्यांचे ऊर्जा केंद्र होते आहे आणि यापुढे देखील राहील एखाद्या चार्जिंग स्टेशनवर गेल्यानंतर ज्याप्रमाणे आपण गाडी चार्ज करतो अग्नि त्याचप्रमाणे मंदिरात गेल्यानंतर आपली बॅटरी चार्ज होते व दिवसभर जे काम आपण हाती घेतला आहे ते काम पूर्णत्वास नेण्यासाठी आपणास ऊर्जा मिळते. भारतीय मंदिर हे केवळ उपासनेचे किंवा प्रार्थनेचे ठिकाण नसून वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेण्यासाठी एकत्र येण्याचे शक्ती स्थळ आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.



मंठा तालुक्यातील हेलस येथे श्री कालिंका देवी संस्थान च्या ४२ व्या वार्षिक यात्रोत्सव कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, मंदिराची स्थापत्य कला हेमाडपंथी बांधकाम ही खऱ्या अर्थाने प्राचीन काळातील विज्ञान आहे यामध्ये मूर्तीच्या आकारापासून ते मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेपर्यंत प्रत्येक बाबीमध्ये एक ऊर्जा केंद्र तयार झालेले असते. प्राचीन काळातील मंदिरे आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवतात तोच वैज्ञानिक दृष्टिकोन आपण पुढे नेणे गरजेचे आहे असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.

हेलस गावाला खूप मोठा सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वारसा लाभलेला असून गावातील मंदिरे परिसरातील नागरिकांसाठी एक अमूल्य ठेवा आहे. मतदार संघातील ज्या ज्या गावांमध्ये मंदिराचे बांधकाम करण्यात आले त्या प्रत्येक गावात आपण सभामंडप मंजूर केला आहे श्री कलिंका देवी संस्थान च्या पदाधिकाऱ्यांनी मागणी केल्याप्रमाणे या ठिकाणी देखील पुढील दोन ते तीन महिन्यात सभामंडप बांधकाम केले जाईल अशी घोषणा यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली. ग्रामस्थ व कासार समाज बांधवांच्या वतीने वर्गणीच्या माध्यमातून लोकवाटा उपलब्ध करून देत मंदिरातील परिसरात पेव्हर ब्लॉक व संरक्षण भिंत बांधल्याबद्दल आमदार लोणीकरांनी संस्थानच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक देखील केले.

यावेळी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, परकीय आक्रमण करताना भारतीयांची ऊर्जा स्थळे कोणती आहेत ही ओळखून जर भारतीय ऊर्जा स्थळे उद्ध्वस्त झाली तर भारतीय संस्कृती भारतीय विज्ञान आणि भारतीय नागरिक देखील उद्ध्वस्त होतील ही भावना लक्षात घेऊन आयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्राच्या मंदिरासह मोठमोठ्या ऊर्जा केंद्र असणाऱ्या मंदिरांचा विध्वंस केला परिणामी भारतीय हिंदू ऊर्जा केंद्रांपासून दूर झाला परंतु पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने पुढाकार घेऊन वेगवेगळ्या समित्यांच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयासमोर राम मंदिराची बाजू मांडली व परिणामी पान २ वर

# संपादकीय

## एप्रिल फूल

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फूल म्हणून साजरा केला जातो. फूल ( षेश्र ) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फूल करण्याचा आनंद आपण सगळ्यांनीच लुटला असेल. एप्रिल फूल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू, सुशिक्षित लोक मूर्ख ( षेश्र ) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फूल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फूल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फूल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हॉट्सप, ट्विटर, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फूल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फूल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फूल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फूल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फूल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फूल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फूल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिल फूल करावे. मोठेपणाला एप्रिल फूल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिल फूल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पुढील ३ महिने सूर्य ओकणार आग

## उष्णतेच्या लाटेबाबत आयएमडीने दिला राज्यांना सतर्कतेचा इशारा

**नवी दिल्ली -** भारतीय हवामान विभागानं (आयएमडी) महत्वाची माहिती दिली आहे. एप्रिल ते जून या कालावधीत भारतातील तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. मध्य आणि पूर्व भारत तसेच उत्तर-पश्चिम मैदानी भागात उष्णतेची लाट अधिक दिवस टिकून राहू शकते. भारतीय हवामानशास्त्र विभागाने सोमवार (३१ मार्च २०२५) ही माहिती दिली आहे.

आयएमडीचे प्रमुख मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम आणि पूर्व भारतातील काही भाग वगळता देशातील बहुतांश भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त असेल. या दोन्ही भागात तापमान सामान्य राहण्याची शक्यता आहे. एप्रिल ते जून या काळात उत्तर आणि पूर्व भारत, मध्य भारत आणि उत्तर-पश्चिम भारताच्या मैदानी भागात उष्णतेची लाट सामान्यपेक्षा दोन ते चार दिवस जास्त राहण्याची शक्यता आहे. साधारणतः एप्रिल ते जून या काळात भारतात चार ते सात दिवस उष्णतेची लाट असते.

बहुतांश भागात किमान तापमानही सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या एका अधिकाऱ्याने यापूर्वी सांगितले होते की उत्तर-पश्चिम भारतात उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटेच्या दिवसांची संख्या दुप्पट होऊ शकते. या प्रदेशात उन्हाळी हंगामात साधारणपणे पाच ते सहा दिवस उष्णतेच्या लाटा राहतात.

'या' राज्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याचा अंदाज

ज्या राज्यांमध्ये उष्णतेची लाट सामान्यपेक्षा जास्त दिवस राहण्याची शक्यता आहे त्यामध्ये राजस्थान, गुजरात, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक आणि तामिळनाडूच्या उत्तरेकडील भागांचा समावेश आहे.

एप्रिलमध्ये भारतातील बहुतांश भागात कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची अपेक्षा आहे. दक्षिणेकडील आणि उत्तर-पश्चिम भागातील काही भागात तापमान सामान्य राहू शकते. उत्तर-पश्चिम आणि ईशान्येकडील काही ठिकाणे वगळता देशातील बहुतांश भागात किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त असेल, जेथे तापमान सामान्य किंवा किंचित कमी असू शकते अशी माहिती महापात्रा यांनी दिली.

यंदाच्या उन्हाळ्यात विजेच्या मागणीत ९ ते १० टक्के वाढ होण्यासाठी भारताने तयार राहावे, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे. गेल्या वर्षी, ३० मे रोजी देशभरातील सर्वोच्च वीज मागणी २५० ऋथ च्या वर गेली होती, जी आधीच्या अंदाजापेक्षा ६.३ टक्के अधिक होती. हवामानातील बदल हा विजेची मागणी वाढवणारा एक प्रमुख घटक आहे.

# भाजपाला निवडणूक जिंकण्यासाठी संघ कशी मदत करतो? विरोधीपक्ष कुठे कमी पडतात?

भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात अतूट नाते आहे. संघाच्या मुशीतून तयार झालेले अनेक स्वयंसेवक नंतर भाजपमधून राजकारणात सक्रिय झाले. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेक वर्ष संघाचे प्रचारक राहिलेले आहेत. भाजपाला निवडणूक जिंकवण्यासाठी संघाचं मोठं योगदान असतं, असं राजकीय विश्लेषक सांगतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपुरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाला नुकतीच भेट दिली. या भेटीची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे. यादरम्यान, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते प्रकाश करात यांनी इंडियन एक्स्प्रेसला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी राजकारणातील अनेक महत्वांच्या मुद्द्यांवर भाष्य केलं.

तमिळनाडूतील मदुराई येथे २ ते ६ एप्रिल दरम्यान मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची महत्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीत पक्षाची स्वतंत्र ताकद वाढवण्याची गरज आणि राजकीय महत्व याबाबत चर्चा केली जाणार आहे. या बैठकीपूर्वी इंडियन एक्स्प्रेसने सीपीआय नेते प्रकाश करात यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत करात यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका, इंडिया आघाडीचे राजकीय भवितव्य, भाजपाला निवडणूक जिंकण्यासाठी संघ कशी मदत करतो? विरोधीपक्ष निवडणुकीत कुठे कमी पडतात? अशा अनेक महत्वाच्या विषयांवर सडेतोड उत्तरे दिली.

आगामी काळात इंडिया आघाडीचे राजकीय भवितव्य काय? सर्व पक्ष एकजूट राहणार का? असा प्रश्न करात यांना मुलाखतीत विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना, लोकसभा निवडणुकीचे निकाल लागून जवळपास नऊ महिन्यांचा कालावधील लोटला आहे. केंद्रातील नवीन सरकारने त्यांचे कामही सुरू केलं आहे. या नऊ महिन्यांच्या कालावधीत इंडिया आघाडीची एकही बैठक झालेली नाही. या आघाडीच्या स्थापनेचा उद्देश भाजपाला लोकसभा निवडणुकीत बहुमताचा आकडा गाठण्यापासून दूर ठेवावं, असा होता. त्यांना ३०० जागांच्या आत रोखण्यात इंडिया आघाडीला यश मिळालं. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर काय करावं हे आघाडीतील घटकपक्षांना कळालं नाही, असं करात यांनी म्हटलं आहे.

आमच्या पक्षाला वाटते की, सर्व धर्मनिरपेक्ष विरोधी पक्षांसाठी एका व्यापक व्यासपीठाची आवश्यकता आहे. निवडणुकीनंतर हे व्यासपीठ कसे पुढे नेता येईल यावर काम करण्याची गरज आहे. इंडिया आघाडीचा विचार फक्त राष्ट्रीय पातळीवर करण्यात आला. राज्यातील निवडणुकांमध्ये युती करण्यास घटकपक्षांनी टाळाटाळ केली. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टीने कॉँग्रेसशी युती केली नाही. परिणामी दोन्ही पक्षाला मोठा फटका बसला आणि भाजपाने २७ वर्षानंतर राजधानीत सत्तास्थापन केली, असंही करात म्हणाले.

इंडिया आघाडीतील एकजूट टिकून राहावी यासाठी कोणत्या पक्षाने पुढाकार घ्यायला हवा, अशा प्रश्न प्रकाश करात यांना विचारण्यात आला. यावर उत्तर देताना, कॉँग्रेस हा इंडिया आघाडीतील सर्वात मोठा घटकपक्ष आहे. त्यांच्या नेत्यांनी जर बैठक बोलावली तर घटकपक्षातील सर्वजण उपस्थित राहतील याची मला खात्री आहे, असं प्रकाश करात यांनी म्हटलं आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष वारंवार सांगत आहे की, आम्ही कॉँग्रेसबरोबर युती करू शकत नाही. भाजपाविरोधी मतांची एकजूट करण्यासाठी युती करणं योग्य राहणार नाही का? असा प्रश्न करात यांना विचारण्यात आला. यावर उत्तर देताना, आमच्यासाठी, युती या शब्दाचा अर्थ खूप व्यापक आहे. हा केवळ निवडणूक करार किंवा जागावाटपाचा मुद्दा नाही. युती म्हणजे दोन्ही पक्षांचे विचार एक असणं. कॉँग्रेस आणि आमच्या पक्षात अनेक मुद्दे आणि आर्थिक धोरणांवरून मतभेद आहे. त्यामुळे त्यांची आणि आमच्या पक्षाची युती होणे शक्य नाही, असं करात यांनी स्पष्ट केलं आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने अनेक आंदोलनं करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्यातील बऱ्याच आंदोलनांमध्ये त्यांना यशही आलं. मात्र, या आंदोलनांमुळे लोक प्रभावीत होऊन सीपीआयच्या पाठिशी का उभे राहिले नाहीत? असा प्रश्नही प्रकाश करात यांनना विचारण्यात आला. यावर बोलताना, राजकीय पक्षाच्या आणि त्यांच्या संघटनेच्या कार्याची पद्धत महत्वाची आहे, असं करात यांनी म्हटलं आहे. याबाबत त्यांनी भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उदाहरणही दिलं आहे.

ते म्हणाले, आपण भाजपा, संघ आणि हिंदुत्ववादी शक्तींशी लढण्याबद्दल बोलतो. पण त्यांचा विस्तार कसा झाला आहे? अनेक पक्षांप्रमाणेच आपणही निवडणुकीच्या विविध मुद्दे उचलून धरतो. सामाजिक प्रश्न बाहेर काढतो, सर्वसामान्यांच्या मुद्द्यांवर लक्ष वेधतो. कारण, आपल्याला असं वाटतं की, या मुद्द्यांवरूनच सत्ताधाऱ्यांना पराभूत करता येऊ शकतं. परंतु, तसं अजिबात नाही. निवडणुकीची तयारी वर्षांनुवर्ष करावी लागते. संघाचे स्वयंसेवक सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात नेहमीच कार्य करीत असतात. निवडणुकीच्या आधी पडद्यामागून संघाचे कार्यकर्ते पक्षाचा प्रचार करीत असतात. याचा फायदा भाजपाला निवडणुकीत होतो.

आपण कुठे आहोत? आपणही तेच करत आहोत का? भाजपा आणि संघाचा मुकाबला कसा करायचा यावर आपण काम करायला पाहिजे. उदाहरण द्यायचं झाल्यास आपण श्रद्धाळू लोकांमध्ये जावं आणि त्यांना समजून सांगावं की, आपण त्यांच्या धार्मिक श्रद्धेविरुद्ध नाही तर राजकारणासाठी धार्मिक श्रद्धेचा वापर करणाऱ्यांविरुद्ध लढत आहोत. या संदर्भात गेल्या पक्ष कॉँग्रेसमध्ये दिलेल्या सूचना योग्य होत्या, परंतु आम्ही त्या अंमलात आणण्यात अयशस्वी झालो, कारण ते कसे करायचे हे आम्हाला किंवा आमच्या कार्यकर्त्यांना योग्यरित्या माहीत नव्हते, असंही करात यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, १५ मार्च रोजी करात यांनी महाराष्ट्रातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या निकालाविषयी भाष्य केलं होतं. ते म्हणाले होते की, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला चांगलं यश मिळालं होतं. कारण, आघाडीतील तिन्ही घटकपक्षांनी या निवडणुकीत एकजूट दाखवली होती. त्यामुळे भाजपाला तिथे जास्त जागा जिंकता आल्या नाहीत. मात्र, विधानसभा निवडणुकीत उलटंच घडलं. भाजपाच्या नेतृत्वाखाली महायुतीने राज्यात सर्वाधिक जागा जिंकल्या. यामागचं कारण म्हणजे, या निवडणुकीत महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये एकजुटता दिसून आली नाही.

झारखंडमध्ये इंडिया आघाडीने चांगली कामगिरी केली. त्यामुळे भाजपाला तिथे यश मिळवता आलं नाही. राज्यांनुसार परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलत असल्याने विरोधीपक्ष कोणत्याही निष्कर्षावर पोहोचू शकले नाही. उदाहरणार्थ, झारखंडमध्ये इंडिया आघाडीनं चांगली एकजुटता दाखवली आणि ते भाजपाचा पराभव करण्यात यशस्वी झाले. या विधानसभा निवडणुकीनंतर सर्वसामान्यांचा असा समज आहे की, भाजपाने इंडिया आघाडीला पराभूत करून राजकारणात आपले स्थान मजबूत केले आहे. परंतु, मला असं वाटतं की इंडिया आघाडी फक्त लोकसभेसाठी स्थापन करण्यात आली होती. राज्यांच्या निवडणुकांसाठी तिचा फारसा विचार करण्यात आला नव्हता, असंही प्रकाश करात म्हणाले.

# दापोडी शाळेतील कु.श्रेयश खोडवे नवोदय परीक्षेत पात्र



**दौंड । प्रतिनिधी -** तालुक्यातील दापोडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी कु.श्रेयश संतोष खोडवे याने खुल्या प्रवर्गातून नवोदय परीक्षेत यश मिळवले. तालुक्यातुन नवोदय विद्यालय पिंपळे जगताप येथे प्रवेशासाठी पात्र ठरला आहे .

जवाहर नवोदय या परीक्षेत जिल्ह्यातून फक्त ८० मुलांची निवड केली जाते.निवड झालेल्या विद्यार्थ्यांना बारावीपर्यंतचे मोफत शिक्षण दिले जाते.

दापोडी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता अतिशय उत्तम असून शिष्यवृत्ती परीक्षेतही दरवर्षी शाळेचा निकाल चांगला असतो. त्यामुळे गुणवत्तेचा उत्तम दर्जा ठेवणाऱ्या दापोडी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांचे विशेष कौतुक होत आहे.

या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या वर्गशिक्षिका श्रीम. पुष्पा किशोर चव्हाण यांनी योग्य नियोजन करून जादा तास व प्रश्नपत्रिकांचा सराव घेतला . तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र फणसे, केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीम.लता हिंगणे,विस्तार अधिकारी सुनील घुमरे साहेब यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. दौंड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संजय महाजन साहेब ,शाळा व्यवस्थापन समिती तसेच समस्त ग्रामस्थ दापोडी यांनी कु. श्रेयश याचे कौतुक केले.

# प्रदीप देठे याने एम.बी.बी.एस पदवी प्राप्त करत आई - वडिलांची केली स्वप्नपूर्ती

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** आंबेगाव असलेल्या जेमतेम एक हजार वस्तीच्या आंबेगाव येथील प्रदीप देठे याने एम.बी.बी.एस पदवी प्राप्त करत आई -वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. आंबेगाव ता. जाफ्राबाद येथील देठे परिवारातील पहिला डॉक्टर म्हणुन प्रदीप कचरूबा देठे पाटील ठरला. त्याने जे जे मेडिकल कॉलेज हॉस्पिटल मुंबई येथून एम.बी.बी.एस पदवी प्राप्त करून आपले आणि आपल्या आई वडील स्वप्न पूर्ण केले. परिस्थिती कशीही असो ध्येय ठेवून केलेले काम नक्की ध्येयप्राप्ती करते असा डॉ. देठे यांनी दिला. या यशाबद्दल श्री. शालिकराम म्हस्के, गौतम म्हस्के, संजय देठे, डॉ. अविनाश सुरुशे, डॉ पवन वराडे, अलकेश सोमाणी, शेख



नसीम मुख्याध्यापक नंदकुमार काळे, संजय निकम, ज्ञानेश्वर उखर्डे, संजय बोडखे आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस देठे यांना शुभेच्छा दिल्या.

# ईद सणाला जाणून बुजून महावितरणकडून शहरातील जुना जालना भागात वीज बंद

## सामाजिक कार्यकर्ता साद बिन मुबारक यांचा आरोप



**जालना । प्रतिनिधी -** मुस्लिमांच्या ईद सणाला जाणून बुजून महावितरणकडून वीज बंद केली असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी केला आहे. हा प्रकार काही आजच घडत नसून गेल्या २ वर्षांपासून घडत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला.महावितरण जाणून बुजून मुस्लिमांच्या पवित्र सणाला हा प्रकार घडवून आणत असल्याचं ते यावेळी म्हणाले. विशेष म्हणजे आज ईदच्या दिवशी सकाळी ०५ वाजताच महावितरणकडून माळीपुरा दुखी नगर संजय नगर शंकर नगर शिशटेकडी कुरेशी मोहल्ला चंदनझिरा यासह अधिभागात लाईट बंद करण्यात आली.याच कारण महावितरणला विचारलं असता,फिडरवर लोड आल्याचं महावितरणकडून सांगण्यात आलं.एवढ्या सकाळी लोड येण्याचं कारण देखील महावितरण स्पष्ट करू शकलं नाही. येणाऱ्या काळात प्रभागात भामट्या आमदार खासदार नगरसेवकांचा सामना करून त्यांचा बंदोबस्त करणं गरजेचं असल्याचं साद बिन मुबारक म्हणाले. मुस्लिम धर्माची ही समस्या लोकप्रतिनिधीना दिसली नाही का! यांना फक्त नागरिकांचे मते घ्यायची आहे नागरिकांची समस्या दिसत नाही का असा सवाल देखील साद बिन मुबारक यांनी उपस्थित केला.

शहरातील विविध भागांचा वीजपुरवठा महावितरण कडून खंडित झाला होता. त्यामुळे सणाच्या दिवशी वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागले. यामुळे जालन्यातील नागरिकांनी महावितरण कंपनीवर आपला रोष व्यक्त करत लोकप्रतिनिधींना महावितरणच्या कारभाराविरोधात पुढाकार घेऊन महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

यावेळी साद बिन मुबारक महमूद भाई, तौफीक भाई, मस्तान भाई, बक्शी सर, साबेर सर, ऐकबाल भाई, मनान भाई, गुडू भाई, मुनना भाई, नूर मोहम्मद, अनसार भाई, जाकीर खान, मजहर भाई, साजीद भाई यांच्यासह परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती

पान ४ वरुन

### स्फोटके निर्मिती ...

लागलेल्या आगीमुळे एकच खळबळ उडाली.

ही आग 'शॉर्ट सर्किट'मुळे लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. स्फोटके बनविणाऱ्या कंपनीला लाग लागल्याची माहिती मिळताच काटोलचे सहायक पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्यासह अग्निशमन दलाची वाहने तातडीने घटनास्थळी रवाना झाले. दोन तासांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. गेल्या फेब्रुवारी महिन्यात काटोल तालुक्यातील कोतवालबड्डी येथील एसबीएल बारूद कंपनीमध्ये स्फोट झाल्याची घटना ताजीच असताना दुसरी घटना घडल्यामुळे व्यवस्थापनाच्या कार्यप्रणालीवर संशय निर्माण झाला आहे.

### वस्तू भांडार ...

गोविंद ओझा सर्वोत्कृष्ट फलंदाज ठरला, तर किचन मार्वल्स संघाचा सुमित सारस्वत सर्वोत्कृष्ट गोलंदाज ठरला.

स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विजेता संघाचा कर्णधार शिवम लाहोटी, संघमालक किरण मद्दलवार, तसेच उपविजेता संघाचा कर्णधार सुमित सारस्वत आणि संघमालक राहुल मित्तल यांनी पारितोषिक स्वीकारले.

### प्राचीन मंदीरामधील ...

आज जगातील सर्वात सुंदर अशे प्रभू श्रीरामचंद्राची मंदिर अयोध्येत उभे राहिले. भारतीय संस्कृती वर अनेक हल्ले झाले परंतु भारतीय संस्कृती संपुष्टात आली नाही ती संस्कृती टिकवण्याची आणि पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी तुम्हा आम्हा सर्वांची आहे अशी प्रतिपादन देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

यावेळी श्रीकालिंका देवी मंदिर संस्थानच्या ४२ व्या वार्षिक यात्रा उत्सव निमित्त आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते देवीची महाआरती करण्यात आली याप्रसंगी भारतीय जनता पक्षाचे मंठा तालुकाध्यक्ष सतीशराव निर्वळ गोपाळ काटकर संस्थानचे अध्यक्ष सतीश तळणीकर विलासराव वानरे कैलासराव बोराडे विलास घोडके सरपंच नामदेव बनसोडे बालासाहेब दहिभाते भरत दहिभाते कैलास खराबे केशव खराबे सुभाष दहिभाते कृष्णा खरावे भगवान खराबे कैलास चव्हाण रमेश वाघमारे शंकरराव हेलसकर वर्धमान कासार ज्ञानेश्वर हेलसकर पंढरीनाथ हेलसकर नारायण कुंभकर्ण यांच्यासह अनेक मान्यवर पंचक्रोशीतील नागरिक गावकरी व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारा रेशनचा तांदूळ परतूर तहसील कार्यालयाच्या पथकाने पकडला

**परतूर -** काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारा ३० टन रेशनचा तांदूळ परतूर तहसील कार्यालयाच्या पथकाने पकडलाय. परतूर तालुक्यातील वाटूर फाटा येथे ही कारवाई करण्यात आलीय. या प्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय. परतूर येथून एका ट्रक (क्र. चह २० ऋउ २१२१) मधून अवैधरित्या रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात विक्रीसाठी नेला जात असल्याची गुप्त माहिती परतूर तहसील कार्यालयाच्या पथकाला मिळाली होती.



त्या माहितीवरून तहसील कार्यालयाच्या पथकाने सदरील ट्रकचा पाठलाग करून पिंपरखेडा वाटुर फाट्याजवळ सदरील ट्रक थांबवला. यावेळी ट्रक चालक आणि क्लिनरला ट्रक मध्ये काय घेऊन जाताय याची विचारपूस केली असता त्यांनी गाडीत तांदूळ असल्याचं सांगितलं. सदरील तांदूळ हा परतूर येथून विजू कुरेशी व युनूस शेख यांनी गाडीमध्ये भरून देऊन गोंदियाकडे घेऊन जाण्यास सांगितल्याचं ट्रक चालक आणि क्लिनरने सांगितले. यावेळी तहसील पथकाने ट्रक चालक आणि क्लिनरकडे तांदूळ खरेदीची पावती/ कागदपत्रे मागितली असता त्यांनी कागदपत्रे नसल्याचं सांगितलं. त्यामुळे परतूर तहसीलदार यांनी सदरील ट्रक आणि तांदूळ ताब्यात घेऊन या प्रकरणी पाच जणांविरुद्ध परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलाय. ट्रॅक मालक अनिल घुले, ट्रक चालक प्रवीण घुले, ट्रक क्लिअर धनंजय पांजगे, विजू कुरेशी आणि युनूस शेख अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ५ जणांची नावे आहेत.







## ८ एप्रिल पासून जालन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला

# श्रीरंजन आवटे, संजय आवटे, चंद्रकांत झटाले, रजिया सुल्ताना, देवेंद्र इंगळे विचार मांडणार

**जालना । प्रतिनिधी -** सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेस मंगळवार ८ एप्रिल २०२५ पासून सुरूवात होणार आहे. सलग पाच दिवस चालणाऱ्या या व्याख्यानमालेत श्रीरंजन आवटे, संजय आवटे, चंद्रकांत झटाले , रजिया सुल्ताना, देवेंद्र इंगळे आदी महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक व विचारवंत आपले विचार मांडणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या आयोजनाबाबत आज ( दि. ३१) आयोजित पत्रकार परिषदेत अधिक माहिती देतांना व्याख्यानमालेचे अध्यक्ष ड. शिवाजी आदमाने म्हणाले की, ९ एप्रिल १९७८ साली सुरू झालेली जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला यंदा ४८ व्या वर्षात पर्दापण करीत आहे. महाराष्ट्रात ऐतिहासिक ठरलेल्या या व्याख्यानमालेत महाराष्ट्रासह देशभरातील ख्यातनाम लेखक, विचारवंत मंडळींनी उपस्थित राहून प्रबोधन केले आहे. ही व्याख्यानमाला ४७ वर्षापासून तळागाळातील समाज घटकापर्यंत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांचे परिवर्तनवादी विचार पोहचवण्याचे कार्य करीत आहे. ४८ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेस दिनांक ८ एप्रिल २०२५ पासून सुरूवात होत आहे. दिनांक ८ एप्रिल ते १२ एप्रिल दरम्यान सायंकाळी ७ वाजता जालना शहरातील अंबड रोडवरील नूतन वसाहत भागात असलेल्या स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या प्रांगणावर या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी आमदार अर्जूनराव खोतकर यांच्या हस्ते या व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. यानंतर पुणे येथील लेखक व विचारवंत श्रीरंजन आवटे हे ' भारतीय संविधान, आपलं आयकार्ड' याविषयावर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफणार आहेत. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. ब्रम्हानंद चव्हाण हे अध्यक्षस्थानी राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक घनश्याम दास गोयल, सामाजिक नेते सुधाकर निकाळजे, अशोक साबळे ,जालना जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. अनिरुद्ध घुले हे उपस्थित राहणार आहेत.

दिनांक ९ एप्रिल रोजी दैनिक लोकमतचे मुख्य संपादक तथा विचारवंत संजय आवटे हे ' चला उभारूया नवी पिढी' या विषयावर व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते ड. बी. एम. साळवे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार,दीशा नॉलेज सिटीचे संचालक डॉ. सुशील सूर्यवंशी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर एखंडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दिनांक १० एप्रिल रोजी अकोला येथील विचारवंत चंद्रकांत झटाले हे ' स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव' या विषयावर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी रिपाइंचे जालना जिल्हाध्यक्ष गणेशराव रत्नपारखे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. माजी आमदार कैलास गोरंट्याल ,डॉ.प्रदीप हुशे, डॉ. दयानंद भक्त, डॉ. संजय लाखे पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दिनांक ११ एप्रिल रोजी अमरावती येथील प्रसिद्ध विचारवंत रजिया सुलताना ह्या 'स्त्री समजून घेतांना' या विषयावर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी डॉ. मीना बोर्डे ह्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. माजी आमदार राजेश टोपे, जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल,जालना जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुदामराव सदाशिवे, ज्येष्ठ सामाजिक नेते सुभाष गाडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दिनांक १२ एप्रिल रोजी जळगाव येथील प्रसिद्ध विचारवंत डॉ. देवेंद्र इंगळे हे 'आंबेडकरी चळवळ: पुनरूत्थानाची दिशा' या विषयावर व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफणार आहेत. यावेळी ज्येष्ठ सामाजिक नेते सुधाकरराव रत्नपारखे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी डॉ भगवानसिंह डोभाळ,माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, सामाजिक नेते विलास डोळसे , प्रमोद रत्नपारखे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दिनांक १३ एप्रिल रोजी नाशिक येथील प्रसिद्ध गायक चेतन लोखंडे यांच्या भीमगीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. सामाजिक कार्यकर्ते संदीप खरात हे यावेळी अध्यक्षस्थानी राहणार आहेत. यावेळी भास्कर दानवे,सुनिल साळवे, सुधाकरभाई रत्नपारखे, रोहिदास गंगातीवरे, डॉ. रविंद्र काकडे, संजय इंगळे, सचिन कांबळे, कपील खरात, संदीप साबळे, वैशाली सरदार, प्रमोद गायकवाड,ड. माणिक बनसोडे, हरिष रत्नपारखे, दिनकर घेवंदे, किशोर मघाडे,मिलिंद बोर्डे, सद्दाम खान, शेख लालाभाई, रितेश खरात, अमोल बाळराज, हर्षकुमार गायकवाड, गौतम मगर, अमोल सरकटे, ड. राहुल आदमाने, अमृत कोकाटे, श्रीधर अंभोरे, बंडु डोईफोडे, भरत मानकर, अरूण जाधव, राजेंद्र घुले, लक्ष्मीकांत कंकाळ, मिर्झा अफसर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

जालना शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते तसेच नागरिकांनी या व्याख्यानमालेतील मान्यवर विचारवंतांचे मौलिक विचार ऐकण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहनही ड. आदमाने यांनी यावेळी केले.

पत्रकार परिषदेस व्याख्यानमालेचे सचिव प्रा. डॉ.विजय कुमठेकर,ज्येष्ठ सामाजिक नेते, ड. बी. एम. साळवे, ड. ब्रम्हानंद चव्हाण, सुधाकर रत्नपारखे, अशोक साबळे, सुभाष गाडगे, बबनराव रत्नपारखे, राम गायकवाड, अशोक रगडे, मिर्झा अफसर, ड. राहुल आदमाने, ड. सिद्धार्थ चव्हाण, प्रतिक वाघमारे,नवनाथ लोखंडे आदींची उपस्थिती होती.



**जालना जिल्हा परिषदेचे सदस्य शालिकराम पाटील मस्के, जाफराबाद तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट रामधन कळंबे, प्रेस कौन्सिल ऑफ जालना जिल्हा उपाध्यक्ष प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर यांच्यातर्फे ईद मुबारक देताना, तसेच टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सपोनि सचिन खामगळ, सरपंचांचे प्रतिनिधी गौतम दादा मस्के, ईद निमित्त शुभेच्छा देतांना.**

# शेतकऱ्याचे अपहरण करुन त्यास २५ लाख रुपये खंडणी मागणारे पाच दरोडेखोर जेरबंद

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्याचे अपहरण करुन त्यास २५ लाख रुपये खंडणी मागणाऱ्या (०५) दरोडेखोरांना पोलिसांनी जेरबंद केलंय. जालन्याच्या मौजपुरी पोलिसांनी ही कारवाई केलीय. पोलीस ठाणे मौजपुरी जि. जालना येथील शेतकरी फिर्यादी निवृत्ती तांगडे रा.धानोरा ता.जि. जालना यांनी तक्रार दिली कि, दिनांक २२/०३/२०२५ रोजी रात्री ०१.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी मौजे धानोरा येथील त्यांच्या राहत्या घराच्या बाहेर झोपलेले असतांना ०५ ते ०७ अज्ञात चोटयांनी त्यांचे तोंड दाबुन त्यांना त्यांच्या गाडीमध्ये टाकुन जालना मंठा हायवे रोडने जालनाच्या दिशेने घेऊन गेले व त्यांच्या खिशातील १५,०००/- हजार रोख रक्कम काढून घेऊन त्यांना जिवे न मारता सोडुन देण्यासाठी २५ लाख रुपयाची खंडणी मागीतली. फिर्यादी हे घाबरलेले असल्याने दरोडेखोरांना खंडणी म्हणून २५ लाख रु. देण्याचे मान्य केल्याने त्यांना मौजे घोडेगाव फाटा ता.जि. जालना येथे रात्री आणुन सोडुन दिले. त्यानंतर दिनांक २२/०३/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजे सुमारास दरोडेखोरांनी फिर्यादी यांना त्यांच्या फोनवर संपर्क करुन त्यांना धमकावुन खंडणी म्हणुन २५ लाख रु. दे अन्यथा तुझ् यासह तुझ्या कुटुंबालाही संपवुन टाकु अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांनी पोलीस ठाणे मौजपुरी येथे हजर येऊन दिलेल्या फिर्यादी प्रमाणे



पोलीस ठाणे मौजपुरी जि. जालना येथे कलम ३०९ (०४), १४०(२),३५१(२)(३),३(५) ३१०(२) भा. न्या. सं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने गुन्हा उघड करुन आरोपी निष्पन्न करणे बाबत पोलीस अधीक्षक साहेब, जालना यांनी व ईतर वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हा उघडकिस करुन आरोपी अटक करणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार वरीष्ठांनी दिलेल्या सुचना प्रमाणे सदर गुन्हयाबाबत फिर्यादी यांचेकडुन गुन्हयाबाबत सविस्तर हकीकत समजावुन घेऊन डुकरी पिंपरी टोलनाका येथील सी.सी.टि. व्ही फुटेज चेक करुन फिर्यादी यांनी सांगीतलेल्या वाहनाचे वर्णनाप्रमाणे एक स्कार्पिओ वाहन विना क्रमांकाचे दिसले सदर वाहनाचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती काढुन तसेच तांत्रिक विश्लेषणातुन सदर गुन्हयात आरोपी १) गणेश तात्याराव श्रीखंडे २) रामप्रसाद ऊर्फ बाळु डिगांबर शिंदे दोघे रा. सावरगाव (हडप) ता.जि. जालना ३) आकाश अशोक घुले रा. मुकींदपुर, नेवासा फाटा जि. अहिल्यानगर ४) विशाल ऊर्फ गजानन डोंगरे रा. सावरगाव (हडप) ता.जि. जालना ५) आकाश तुकाराम रंधवे रा.हडप ता.जि. जालना यांना नमुद गुन्हयात अटक करुन त्यांना विश्वासात घेऊन त्यांना गुन्हयाबाबत विचारपुस त्यांनी आरोपी नामे अनिकेत गोरख उकांडे रा. अकोलनेर जि. अहिल्यानगर व शाम चव्हाण रा.साळेगाव तांडा ह.मु. सरस्वती मंदिराच्या पाठीमागे खरपुडी, जालना (फरार आरोपी) यांच्या मदतीने केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीतांच्या ताब्यातुन गुन्हया वापरलेले एक स्कार्पिओ वाहन क्र.- चक-२३-ड-७२७२ व आरोपीतांचे मोबाईल असे एकुण (९,८०,०००/-) रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन आरोपीतांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सदर आरोपीतांचा ०४ दिवस पी.सी. आर मंजुर केला असुन गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे. सदर चा गुन्हा हा अजयकुमार बंन्सल, पोलीस अधीक्षक, जालना, आयुष नोपाणी साहेब, अपर पोलीस अधीक्षक, जालना, दादाहरी चौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग परतुर तसेच पंकज जाधव, पो. नि.स्थागुशा, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची कामगीरी ही मिथुन घुगे, सहा. पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी पो.स्टे मौजपुरी, पोउपनि विजय तडवी, ग्रे. पोउपनि जाधव सफौ चंद्रकांत पवार, ज्ञानोबा बिरादार, मच्छिंद्र वाघ, दिलीप गोडबोले, नितीन खरात, राजेंद्र देशमुख, भास्कर वाघ, सतिष गोफणे, नितीन कोकणे, प्रदिप पाचरणे, अविनाश मांटे, धोंडीराम वाघमारे, प्रशांत म्हस्के, सदाशिव खैरे, कैलास शिवणकर, तसेच स्थागुशा चे तांत्रिक विश्लेषण करणारे सागर बावीस्कर केली आहे.

# मुंबईची कोलकाताला नमवत विजयी शंखनाद

**मुंबई -** सलग दोन सामने हरल्यानंतर मुंबई इंडियन्सला अखेर आयपीएल २०२५ मध्ये विजय मिळाला. मुंबईने केकेआरला घरच्या मैदानावर ८ गडी राखून पराभूत केले. मुंबईच्या विजयाची कहानी त्यांच्या गोलंदाजांनी लिहिली. विशेषतः पदार्पणाचा सामना खेळणाऱ्या अश्विनी कुमारने. ज्याने २४ धावा देऊन ४ विकेट घेतल्या. दीपक चहर आणि ट्रेंट बोल्ट यांनीही शानदार गोलंदाजी करत कोलकात्याला फक्त १६.२ षटकांत ११६ धावांवर रोखले. यानंतर, लहान लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने केवळ १२.५ षटकांत सामना जिंकला. रिकेल्टन ४१ चेंडूत ६२ धावांवर नाबाद राहिला. सूर्यकुमार यादवने ९ चेंडूत २७ धावा करत नाबाद राहिला.

# व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत जिल्हा स्तरावर ४७ तर तालुकास्तरावर १३८ पारितोषिके शिक्षकांनी मिळविले

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतर्फे शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर एकूण ४७ पारितोषिके शिक्षकांना देण्यात आली तर तालुकास्तरावर १३८ पारितोषिके शिक्षकांना देण्यात आली. या स्पर्धेसाठी एकूण इयत्ता निहाय पाच गट करण्यात आले होते त्यात इयत्ता पहिली दुसरी, तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी, नववी दहावी, अकरावी बारावी व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी मराठी गणित इंग्रजी विज्ञान सामाजिक शास्त्र या विषयांसाठी व्हिडिओ निर्मिती करण्याचे आवाहन शिक्षकांना करण्यात आले होते जालना जिल्ह्यातील शिक्षकांनी या स्पर्धेला उस्फूर्त प्रतिसाद दिला.

तालुकास्तरीय मूल्यांकन अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था




व गटशिक्षणाधिकारी यांच्या समितीमार्फत करण्यात आले असून जिल्हास्तरीय मूल्यांकन शिक्षणाधिकारी व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांच्या समितीमार्फत करण्यात आले होते. जिल्हास्तरावर प्रथम पारितोषिक रोख रुपये दहा हजार द्वितीय पारितोषिक ९००० तृतीय पारितोषिक ८००० सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. तालुकास्तरासाठी प्रथम पारितोषिक ३००० द्वितीय २००० व तृतीय पारितोषिक दीड हजार रुपये सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन शिक्षकांना गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. आर डी कांबळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जे एस महाविद्यालयाचे संगणक शास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेश सरकटे हे होते, कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. प्रमोद कुमावत, उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, उपशिक्षणाधिकारी सुभाष भालेराव, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता योगेश्वर जाधव भारत सूर्यवंशी श्रीमती प्रेरणा मोरे डॉक्टर श्रीहरी दराडे श्री सय्यद अख्तर तर सर्व तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

याप्रसंगी याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र कांबळे तथा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.राजेश सरकटे यांनी शिक्षकांनी अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा अतिशय उत्तम पद्धतीने वापर करून विद्यार्थ्यास शिकते केले पाहिजे व या पुढील वेगवेगळ्या उपक्रमात अधिकाधिक व्हिडिओच्या आधारे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रवृत्त करावे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धेचे जिल्हा समन्वयक तथा माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख श्री संजय येवते यांनी केले तर श्रीमती निलोफर पटेल यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मनीषा पाटील यांनी केले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री प्रल्हाद सोलाटे विवेक कुलकर्णी प्रशांत हनुमंते दीपक गाड, कैलास गायकवाड सीबी जाधव, प्रफुल राजे यांनी परिश्रम घेतले.

# जनतेने रेशन कार्डाची केवायसी करून घ्यावी - तहसीलदार चव्हाण



**जाफाबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील टेंभुर्णी शहरातील राशन कार्डधारकांची केवायसी करून घेण्यात येत आहे. प्रसंगी निरिक्षण अधिकारी मिना चव्हाण, पुरवठा निरीक्षक भरत आढाव, तांत्रिक सहाय्यक सतिष गुळवे, मशीन इंजिनिअर कैलास खरात यांची प्रमुख उपस्थिती होती.
प्रसंगी तहसिलदार चव्हाण यांनी नागरिकांना रेशन काडची केवायसी करून घेण्याचे आवाहन केले आहे. यावेळी तालुका अध्यक्ष पंडित बोर्डे, सरपंच गौतम म्हस्के, ग्रामविकास अधिकारी जगदीश आढाव, ग्रामसंसद सदस्य गजानन अंधारे, विष्णु जमधडे, फैसल चाउस, किशोर काबळे, प्रमोद उखर्डे, राशन दुकानदार काशीनाथ सतिश काबरा, मुनेमाणिक खुदुस, चाउस नासेर, चाउस अजिस बागवान, बाबासाहेब जमधडे, सुनिल भाले यांच्यासह राशन कार्डधारक केवायसी करण्यासाठी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.